वर्ष- १२ | अंक- ३९ | मुंबई, मंगळवार,११ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

धोकादायक मार्गाची भीषण गोष्ट

3 → देशात 'वन नेशन वन एज्युकेशन 'ची आवश्यकता!

बालूमामा मंदिरात तब्बल 60 कोटी 75 लाखांच्या गैरव्यवहाराचा आरोप ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

खाकी वर्दीला काळिमा !

पोलीस कॉन्स्टेबलकडून स्मशानभूमीत 10 वर्षाच्या मुलीवर अत्याचार



वसई। खाकी वर्दीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. एका हवालदाराने 10 वर्षीय अल्पवयीन मुलीचं अपहरण केलं आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तुरूंगात बंद असलेल्या आरोपीला पोलिसांनी रिमांडमध्ये घेत चौकशी केली. तेव्हा आरोपीने आपल्या क्रूर कृत्याची माहिती पोलिसांना सांगितली. त्यानंतर पोलीस देखील हादरून गेले होते. ही घटना उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथील आहे.

पोलीस कॉन्स्टेबलकडून 10 वर्षाच्या मुलीवर अत्याचार

आरोपीची ओळख अभिषेक यादव अशी समोर आली असून पोलिसांनी त्याची चौकशी केली. अभिषेकने पोलिसांना आपल्या गुन्ह्याचा कबुलीनामा दिला. पोलीस लाईनच्या सरकारी क्वार्टरमध्ये वापरण्यात येणारा चाकू सोबत घेऊन निघाला. 28 जुलै रोजी रात्री 10:00 वाजता त्याने गोरखपूर जिल्हा रुग्णालयातून 10 वर्षाच्या मुलीला फसवून तिचे अपहरण केले. नंतर पोलीस कॉन्स्टेबलने मुलीला थेट स्मशानभूमीत नेलं, जिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला.

मुलीच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर चाकूने वार

कॉन्स्टेबलने पोलिसांनी कबूल केलं की, गेल्या वर्षभरापासून त्याची पत्नी आणि मुले वेगळे राहत असल्याने तो पोलीस क्वार्टर्समध्ये एकटाच राहतो. त्याला मुलींना त्रास दिल्यानंतर आनंद मिळतो. जेव्हा मुलगी ओरडली आणि कोणीतरी येईल या भीतीने त्याने त्या निष्पाप मुलीचा गळा दाबून खून करण्यात आला. पीडितेची ओळख पुसून टाकण्यासाठी, कॉन्स्टेबललने मुलीच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर चाकूने वार करून विद्रूपीकरण केले. त्याने मुलीच्या कमरेखाली एक दोरी घेऊन तिचे हात पाठीमागे बांधले आणि तिचा मृतदेह चिउताहा पुलावरून खाली फेकून दिला होता.

दरम्यान, 4 ऑगस्ट रोजी पोलिसांनी आरोपी कॉन्स्टेबल अभिषेक यादवला पोलिसांनी तुरूंगातून ताब्यात घेतलं. पोलीस पथकाने आरोपीला जिल्हा रुग्णालय. स्मशानभूमि आणि चियुताहा ब्रिज येथे नेले, जिथे घटनेची पुनर्रचना करण्यात आली होती. आरोपीने दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांमध्ये हत्येत वापरण्यात आलेला चाकू जप्त करून तो न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवला आहे. पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणं असंय की, मोबाईल लोकेशन, न्यायवैद्यक अहवाल, सीसीटीव्ही फुटेज आणि साक्षीदारांच्या जबाबाची पाहणी केली. या प्रकरणात न्यायालयीन संघर्ष सुरू आहे. रॅपिडो चालकाचे अश्लील कृत्य

'तसले' व्हिडिओ पाहताना महिला प्रवाशानं रेड हँड पकडलं

ऑटो रिक्षात रॅपिडो चालक अश्लील व्हिडिओ पाहत होता. त्याचक्षणी महिला प्रवाशाने त्याला अश्लील व्हिडिओ पाहताना रंगेहाथ पकडले होते. महिलेनं केलेल्या आरोपानंतर रॅपिडो कंपनीने संबंधित चालकावर मोठी कारवाई केली. ही घटना दिल्लीतील सफरदगंज परिसरात घडली होती. महिलेची डिजिटल क्रिएटर अशी ओळख समोर आली होती. रात्री 8:48 वाजता सफरदगंजच्या मॉडेल टाउन येथे महिलेनं ऑटो बुक केली होती, नंतर ऑटो ड्रायव्हर अश्लील व्हिडिओ पाहून हस्तमैथुन करत होता. महिलेची ही बाब ऐकून सर्वांना मोठा धक्का बसला होता. याच घटनेची महिलेनं रॅपिडो कंपनीकडे तक्रार दाखल केली होती. नंतर आरोपी ड्रायव्हरला प्लॅटफॉर्मवरून कायमचं हटवण्यात आलं. सुरुवातीला सर्व ठीक होतं, मात्र एका ठिकाणी गाडी थांबवण्यात आली आणि तेव्हा तो मोबाइलमध्ये अश्लील व्हिडिओ पाहत होता. तिथेच दुसऱ्या वाहनातील एका महिलेनं रॅपिडो ऑटोत बसलेल्या महिलेला खुनावलं होतं, तेव्हा महिलेनं त्याला अश्लील व्हिडिओ पाहताना पाहिलं, ही बाब चालकाच्या लक्षात आल्यानंतर तो सावध झाला आणि त्याने अश्लील कंटेट बंद केला. महिलेला समजले की, ड्रायव्हर अश्लील कंकेट पाहत असून नंतर चुकीचा स्पर्श देखील करत होता.

महिलेला आणखी 30 मिनिटांपर्यंतचं अंतर कापायचं होतं. नंतर त्यांनी ऑटो रिक्षातून उतरण्याचा निर्णय घेतला. तिला असुरक्षित वाटत होते. याबाबतची माहिती तिने रॅपिडोला दिली होती. त्यांनी सांगितलं की, चालक अश्लील व्हिडिओ पाहत होता. मात्र प्रवासादरम्यान रॅपिडोवरून कोणतंही प्रत्युत्तर आलं नाही. जेव्हा महिला उतरत होता तेव्हा महिलेनं ड्रायव्हरला व्हिडिओ काढत प्रश्न केला, तेव्हा चालकाने अश्लील व्हिडिओ बघत असल्याचं सांगितलं. त्याने सांगितलं की, परदेशी महिलांचे शॉर्ट कपड्यांचे व्हिडिओ बघत होतो. चालकाच्या या कृत्याने रॅपिडो कंपनीने चालकाची कंपनीवरून हकालपट्टी केली.

मुंबईतील बीएमसी मुख्यालयासह सीएसएमटी, मेट्रो, शेअर बाजारात खळबळ

मुंबई। 15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वी मुंबई महापालिका मुख्यालयातील महापौर कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई मेट्रो स्थानके, विविध शाळा आणि शेअर बाजार इमारत उडवून देण्याची धमकी काही अज्ञातांनी दिली. त्यामुळे सर्वत्र मोठी खळबळ उडाली. मुंबई पोलीस यंत्रणा सुरक्षिततेच्या दृष्टीने युद्धपातळीवर कामाला लागली. परंतु, सर्व प्रकारच्या तपासणीअंती पूर्वीप्रमाणेच हादेखील एक धमक्यांच्या अफवेचा फुसका बार असल्याचे स्पष्ट झाले. मुंबई मेट्रोसह रेल्वे, शेअर बाजार आणि महापौर कार्यालय या ठिकाणी बॉम्ब शोधक पथकामार्फत तातडीने तपासणी करण्यात आली.



पालिका मुख्यालयात सुरक्षारक्षकांचा ताफा वाढविण्यात येऊन प्रवेशद्वारावर कडक तपासणी करण्यात आली. मात्र, संशयास्पद काहीच न सापडल्याने पोलिसांनी देखील सुटकेचा निःश्वास सोडला. यापूर्वी, 10 जून रोजी सकाळच्या सुमारास मुंबईच्या महापौर रितू तावडे यांचे कार्यालय आणि वाहन बॉम्बने उडवून देण्याची धमकी खलिस्तानवादी संघटनेकडून मेलद्वारे तीन अतिरिक्त आयुक्तांना ई मेल पाठवून देण्यात आली होती. मात्र, नंतर तपासणी केल्यावर त्यावेळी ती धमकी अफवा ठरली होती. परंतु, शुक्रवारी 7 ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास महापौर कार्यालयाला धमकी देण्यात आल्यानंतर तात्काळ पालिका मुख्यालयात, महापौर कार्यालय येथे सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली. बॉम्ब शोधक पथकाने महापालिका मुख्यालयात कसून तपासणी केली. तसेच, पालिका मुख्यालयात बाहेरून येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आणि त्यांच्याकडील सामानाची कडक तपासणी करण्यात आली. मात्र, सदर धमकी अफवा असल्याचे निष्पन्न झाले. सदर धमकीवजा मेलमध्ये खलिस्तान समर्थक घोषणा आणि काही व्यक्तींची नावे नमूद करण्यात आली होती. तसेच, पालकांनी सदर धमकीवजा इशारा पाहता मुलांना शाळेत पाठवू नये. तसेच, मेट्रो रेल्वेने प्रवास करू नका, असा इशाराही देण्यात आला होता. या ई-मेलचा आयपी, स्रोत आणि प्रेषकाचा शोध सायबर पोलिसांकडून घेण्यात येत आहे.

सौदीहून आलेल्या विमानात बिडी ओढण्याने प्रवाशाला मुंबई विमानतळावर अटक

मुंबई। सौदी अरेबियातील दम्मामहून येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाच्या स्वच्छतागृहात बिडी ओढणे केरळमधील एका प्रवाशाला महागात पडले. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान उतरताच सहार पोलिसांनी त्याला अटक केली. संपूर्ण विमानात विविध ठिकाणी ह्यधूम्रपान करू नकाह्ण असे फलक लावलेले असूनही आणि उड्डाणापूर्वी धूम्रपानास मनाई करणाऱ्या वारंवार घोषणा करूनही, त्याने नियमांचे उल्लंघन केले. अटक करण्यात आलेल्या प्रवाशाची ओळख केरळमधील अलाप्पुझा येथील रहिवासी नूरी बहुलेयन (34) अशी पटली आहे. पोलिसांनी त्याच्यावर भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.



सहार पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना दम्मामहून मुंबईला जाणाऱ्या एअर इंडियाच्या अक-4250 या विमानात घडली. विमान उड्डाणानंतर लगेचच, 21ऱ्या आसनावर बसलेला बहुलेयन स्वच्छतागृहात गेला. तो बाहेर येताच, केबिन क्रूच्या लक्षात आले की स्वच्छतागृहातून धूर येत आहे. चौकशी केल्यावर, प्रवाशाने स्वच्छतागृहात बिडी ओढल्याचे कबूल केले. केबिन क्रू सदस्य दीपेश भगत यांनी तात्काळ पायलटला ही माहिती दिली. पायलटने मुंबईत आगमन झाल्यावर प्रवाशाला एअरलाइनच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या ताब्यात देण्याचे निर्देश दिले. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एअर इंडियाचे सुरक्षा सहाय्यक विवेक पिल्लई यांनी सहार पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीत नमूद केले आहे की, पायलटने या घटनेची माहिती एअर ट्रॅफिक कंट्रोललाही दिली होती. विमान उतरल्यानंतर, केबिन क्रूने प्रवाशाला एअरलाइनच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या ताब्यात दिले, ज्यांनी नंतर त्याला सहार पोलिसांच्या ताब्यात दिले. सहार पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, प्रत्येक विमानात धूम्रपानावर पूर्ण बंदी असल्याबद्दल हिंदी आणि इंग्रजीमध्ये स्पष्ट घोषणा केल्या जातात आणि विमानात विविध ठिकाणी ह्यनो स्मोकिंगह्ण (धूम्रपान करू नका) असे फलकही लावलेले असतात. असे असूनही, काही प्रवासी नियमांचे उल्लंघन करतात, ज्यामुळे विमान सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे, अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई केली जाते.

कोचिंग क्लासमध्ये विद्यार्थीनीवर शिक्षकाकडून अत्याचार

मुंबई। कोचिंग क्लासला जाणाऱ्या विद्यार्थीनीला तिच्याच शिक्षिकेनं लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केला. त्याने पीडितेले अनेक व्हिडिओ आणि फोटो काढून ठेवले. पीडितेचे व्हिडिओ व्हायरल करण्याची आरोपीने धमकी दिली. आरोपीने पीडितेच्या वडिलांना अश्लील फोटो पाठवल्यानंतर 17 जुलै रोजी पीडितेच्या आईने पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली. ही घटना बिहारच्या समस्तिपुरा येथील विभूतिपुर येथील आहे.

शिक्षक विद्यार्थीनीला क्लास **सुटल्यानंतर थांबवून ठेवायचा**

अल्पवयीन विद्यार्थीनी ही दोन वर्षापासून कोचिंग क्लासमध्ये जात होती. पीडित मुलगी सध्या इयत्ता 10 मध्ये शिकत आहे. शिक्षक विद्यार्थीनीला क्लास सुटल्यानंतर एकटीला थांबवायचा. 15 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी त्याने सर्व विद्यार्थ्यांना घरी जाऊ दिलं आणि पीडितेला एकटं थांबवून तिचे लैंगिक शोषण केलं. या घटनेचा व्हिडिओ बनवला आणि कोणाला काही सांगितल्यास व्हायरल करण्याची धमकी देखील दिली.

पीडितेला नशेचे पदार्थ पाजून अत्याचार

ही घटना समाजासमोर उघडकीस आल्यानंतर काय करायचं? लाज अब्रूला विद्यार्थीनी भयभीत झाली होती. सांगण्यात येतंय की, पीडितेचे वडील हे बाहेरगावी मजुरी करायचे. पीडितेचं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ती आपल्या वडिलांकडे निघून गेली. जेव्हा मुलगी वडिलांकडून पुन्हा घरी आली असता, आरोपी शिक्षक तिला सतत फोन करू लागला होता. पीडितेला नशेचे पदार्थ पाजून तिच्यावर अनेकचा अत्याचार केला.

एका दुसऱ्या शिक्षकच्या मदतीने पीडितेच्या लैंगिक शोषणाता व्हिडिओ काढला. पीडितेनं आरोपी शिक्षकावर गुन्हा दाखल करून कारवाईची मागणी केली. पोलिसांनी आरोपीचा शोध घेणं सुरू ठेवलं आहे.

उच्चभ्रू कुटुंबातील मुलाचे हादरवणारे कृत्य

वसई। नागपूरमध्ये एक हादरवणारी घटना समोर आली आहे. ठाण्यातील गर्भश्रीमंत कुटुंबातील तरुणाने हादरवून सोडणारे कृत्य केले आहे. सोशल मीडियावरील मैत्रीचा फायदा घेत एका तरुणीवर विकृत लैंगिक अत्याचार व बेदम मारहाण केल्याचे समोर आले आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावर झालेली मैत्रीतून अल्पवयीन मुलीला हॉटेलमध्ये बोलवले त्यानंतर तिथे तिला बेदम मारहाण व लैंगिक छळ करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा मुळचा ठाण्यातील असून तो नागपुरात आला होता. येथे त्याने त्याच्या इंस्टाग्राम फ्रेंड आणि गेमिंग पार्टनरने असलेल्या मैत्रिणीचा लैंगिक छळ आणि मारहाण केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. धक्कादायक म्हणजे, आरोपीने 16 वर्षाच्या पिडीत तरुणीला बेदम मारहाण केली. तिच्या शरिरावर चाकूने वार केले तसंच, तिचे हात बांधून विकृत लैंगिक कृत्य करत तिचा अतोनात छळ केला. सलग 20 तास तिला एका खोलीत डांबून ठेवत तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले. इतकंच नव्हे तर तिला जीवे मारण्याची धमकी देत तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला. चार वर्षापूर्वी पीडित तरुणी व आरोपीची ऑनलाइन गेमच्या माध्यमातून ओळखा झाली होती. आरोपी हा ठाण्याचा रहिवाशी असून त्याचे वय 19 वर्षे इतके आहे. त्यांची सोशल मीडियाच्या माध्यमातून मैत्री झाली होती. आरोपी हा ठाण्यातील एका सुखवस्तु कुटुंबातील असून तो एका सुप्रसिद्ध डॉक्टरचा मुलगा आणि महाराष्ट्रातील एका वरिष्ठ पोलिसाचा पुतण्या असल्याचे सांगितले जाते.

आरोपी तरुणाने आकाश मेहरा या खोट्या नावाखाली पीडित मुलीशा चॅटिंगद्वारे मैत्री केली होती. त्यानंतर एका वर्षात तो दोनदा नागपूरला आला होता. त्यानंतर वेगवेगळे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन केला होता. पीडित तरुणी रविवारी सकाळी तिच्या मैत्रिणीच्या घरी जात असल्याचे सांगून घराबाहेर पडली होती. त्यानंतर आरोपीने तिला दिघोरीतील रुमवर नेले होते. आरोपीने जीवे मारण्याची धमकी देऊन तिला डांबून ठेवत तिला भयावह शारीरिक आणि मानसिक त्रास दिला. तिच्यावर अत्याचार केला. दरम्यान, 20 तास उलटून देखील मुलगी परत न आल्याने तसेच तिचा फोन लागत नसल्याने तिच्या उच्चपदस्थ वडिलांनी हुडकेश्वर पोलिस ठाण्यात एफ आय आर दाखल केली होती. तक्रार दाखल होताच पोलिसांनी तपास करत दिघोरीवरील त्या रुमवर धाड टाकली आणि तरुणीची सुटका केली. पोलिसांनी तिची सुटका केल्यानंतर सलंग दोन दिवस आरोपीकडून मिळालेल्या यातनांमुळे मुलगी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या पुरती कोलमडली असल्याचे आढळले आहे. तिच्यावर उपचार सुरू असून, आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता तसेच बालसंरक्षण कायद्यान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याशी संबंधित इलेक्ट्रॉनिक पुरावे तसेच वैज्ञानिक पुरावे, डीएनए, फिंगर प्रिंट्स आणि इतर भौतिक पुरावे संकलित करण्याचे काम वेगाने सुरू आहे. आरोपीला न्यायालयात हजर करून दोन दिवसांचा पीसीआर मिळविला आहे.

घोडबंदर किल्ल्यावर होणाऱ्या गैरप्रकारांवर कारवाईची मागणी



भाईंदर। मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्यावर सोशल मीडियासाठी रिल्सच्या नावाखाली सुरू असलेल्या अशोभनीय प्रकारांमुळे किल्ल्याचे पावित्र्य व ऐतिहासिक महत्त्व धोक्यात आल्याचा आरोप मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी केला आहे. याबाबत त्यांनी प्रशासनाकडे तक्रार करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. देशमुख यांनी सांगितले की, गड-किल्ले हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असून येथे अश्लील चित्रीकरण, मद्यपान, अशोभनीय वर्तन आणि शिस्तभंगाच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे किल्ला परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था, नियमित पोलीस गस्त आणि नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अल्पवयीनांकडून नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यांना समुपदेशन करून पालकांच्या ताब्यात देण्याची भूमिका त्यांनी मांडली. घोडबंदर किल्ल्याचे पावित्र्य आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. घोडबंदर किल्ल्यासारख्या ऐतिहासिक वारसा स्थळांचे पावित्र्य आणि सन्मान जपण्यासाठी प्रशासनाने त्वरित ठोस पावले उचलावीत, अशी मागणी मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी केली आहे.

धोकादायक मार्गाची भीषण गोष्ट







एव्हरेस्टच्या शिखराकडे जाणाऱ्या मार्गावर, हिरवे बूट घातलेल्या, 30 वर्षांपूर्वी मृत्यू झालेल्या एका भारतीय गिर्यारोहकाचा मृतदेह त्या धोकादायक मागार्ची भीषण गोष्ट सांगतो. माउंट एव्हरेस्टच्या शिखरापासून खूप थोड्या अंतरावर बर्फात एक मृतदेह गेल्या 30 वर्षांपासून पडून आहे. हिरव्या बुटांमुळे तो 'ग्रीन बूट्स' म्हणून ओळखला जातो.

हे टोपणनाव एका खडकाखाली दबून मृत्यू झालेल्या भारतीय गियारोहकाला देण्यात आले होते. त्यांच्या पायात आजही हिरव्या रंगाचे बूट आहेत. तेव्हापासून हे बूट एव्हरेस्टच्या शिखराकडे जाणाऱ्या गियारोहकांसाठी एक 'भीतीदायक चिन्ह' ठरले आहेत.

आता भारत त्या गियारोहकाचा मृतदेह परत आणण्यासाठी एका बचाव पथकाचा शोध घेत आहे.

जेव्हा हा मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचेल, तेव्हा कदाचित त्यांना या दुःखातून सावरण्यास थोडीफार मदत होऊ शकेल.

1996 मध्ये एव्हरेस्टच्या उत्तरेकडील तिबेट मार्गावरून चढाई करणाऱ्या भारताच्या पहिल्या मोहिमेत सहभागी होण्यासाठी निघण्यापूर्वीच्या आदल्या रात्री दोरजे मोरुप यांनी लडाखमधील आपल्या घरी पत्नी कोंचक यांगस्किट यांच्यासोबत वेळ घालवला होता.

त्यांनी आपल्या पत्नीला वचन दिलं होतं की, ते एक हिरो बनून परत येतील आणि देशाचं नाव उज्ज्वल करतील.

हिमालयाच्या दुर्गम भागातील आपल्या घरातून यांगस्किट यांनी बीबीसीला सांगितलं, ₹त्यांनी मला मुलांची काळजी घेण्यास आणि ते जेव्हा परत येतील तेव्हा त्यांचं स्वागत करण्यासाठी विमानतळावर येण्यास सांगितलं होतं.

दोरजे मोरुप हे उत्साही गियारोहक होते. त्यांनी लडाख पर्वतरांगांमधील सर्वात उंच शिखर 'स्टोक कांग्री'सह अनेक शिखरांवर यशस्वी चढाई केली होती.

फोटो स्रोत,ऋ्रअटक्छ ऌअठऊढवळ

फोटो कॅप्शन,दोरजे मोरुप हे उत्साही गियारोहक होते. त्यांनी लडाख पर्वतरांगांमधील सर्वात उंच शिखर 'स्टोक कांग्री'सह अनेक शिखरांवर यशस्वी चढाई केली होती.

मोरुप यांचे काही फोटो आणि त्यांच्या काही वस्तू आजही कुटुंबीयांना त्यांच्या आठवणी जपून ठेवण्यास मदत करतात.

या मोहिमेतील 6 गियारोहकांपैकी 3 जण हिमवादळामुळे परत फिरले. पण, दोरजे मोरुप आणि भारत-तिबेट सीमा पोलीस दलाचे 2 सदस्य त्सेवांग समनला आणि त्सेवांग पालजोर शिखराच्या दिशेने पुढे गेले.

परत येताना ते हिमवादळात अडकले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

भारताच्या या अयशस्वी मोहिमेतील 2 गियारोहकांचे मृतदेह कधीच सापडले नाहीत. परंतु, तिसऱ्या गियारोहकाचा मृतदेह गेल्या 30 वर्षांपासून बर्फात गोठलेल्या अवस्थेत पालथा पडलेला आहे. हिरव्या बुटांमुळे त्यांना 'ग्रीन बूट्स' म्हणूनही ओळखले जाते.

एव्हरेस्ट सर करण्याच्या प्रयत्नात 300 हून अधिक लोकांचा मृत्यू झालेला आहे. यातील अनेक मृतदेह अजूनही पर्वतावर आहेत.

अनेक वर्षांपासून 'ग्रीन बूट्स' हा त्सेवांग पालजोर यांचा मृतदेह असल्याचे मानले जात होते. परंतु, 2024 मध्ये अधिकाऱ्यांनी याबाबतचं आपलं मत बदललं.

1996 च्या मोहिमेत बचावलेल्या सदस्यांच्या साक्षीवरून आणि गियारोहकांशी झालेल्या शेवटच्या रेडिओ संपर्काच्या ठिकाणावरून या प्रकरणाचा पुन्हा विचार करण्यात आला. आता अधिकाऱ्यांना वाटतं की, हे अवशेष मोरुप यांचेच आहेत.

एका आयटीबीपी अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर बीबीसी न्यूज हिंदीशी बोलताना सांगितलं, त्यांच्या कपड्यांवरून आणि सामानावरून त्यांची ओळख पटवण्यास मोठी मदत झाली.

अधिकाऱ्यांच्या मते, याआधी मृतदेह परत आणण्याची मोहीम सुरू करण्यामध्ये लॉजिस्टिक्स हा एक मोठा अडथळा ठरला होता.

ते म्हणाले, आम्ही त्यांना कधीच विसरलेलो नाही. हा फक्त वेळेचा प्रश्न होता. एकदा मृतदेह ताब्यात आला आणि सर्व औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर कुटुंबीयांना याबाबत कळवलं जाईल.

'त्यांचा मृत्यू झाला आहे, हे मानायला माझं मन तयार नव्हतं'



त्या म्हणतात की, त्या वेळी त्यांना काहीतरी अघटित घडेल अशी जाणीव झाली होती. त्यांना सतत वाटत होतं की, आपण त्यांना पुन्हा पाहू शकू की नाही, याची खात्री नाही.

त्या वर्षी 10 मे रोजी मोरूप हे भारताच्या एव्हरेस्ट मोहिमेतील 6 गियारोहकांपैकी एक होते. हे सर्वजण जगातील सर्वात उंच शिखर एव्हरेस्टवर पोहोचण्याचा प्रयत्न करत होते.

एव्हरेस्ट हे नेपाळ आणि चीनच्या प्रशासनाखालील तिबेट भागाच्या सीमेवर आहे.

बहुतेक गियारोहक एव्हरेस्ट सर करण्यासाठी नेपाळच्या दक्षिणेकडील मागार्ची निवड करतात. कारण उत्तरेकडील तिबेटचा मार्ग अधिक उंच, तीव्र उताराचा आणि धोकादायक आहे.

मोरुप हे लडाखमधील स्कूरबुचान गावचे रहिवासी होते. हे गाव एव्हरेस्टपासून 1 हजार किलोमीटरहून अधिक अंतरावर पश्चिमेला आहे. ते आयटीबीपीमध्ये लान्स नायक या पदावर कार्यरत होते.

आयटीबीपी हे भारत-चीन सीमेच्या मोठ्या भागाच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारे पोलीस दल आहे.

मोरुप यांचा जन्म 1948 मध्ये एका शेतकरी कुटुंबात झाला होता. गरिबीवर मात करण्यासाठी ते 1969 मध्ये आयटीबीपीमध्ये दाखल झाले. 1971 मध्ये त्यांनी यांगस्किट यांच्याशी विवाह केला.

मोरुप यांच्या पत्नी यांगस्किट सांगतात की, त्यांनी कधीच त्यांचा मृतदेह पाहिला नव्हता. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला आहे, यावर विश्वास ठेवणं त्यांच्यासाठी खूप कठीण होतं.

आता साधारण 75 वर्षांच्या असलेल्या यांगस्किट यांना मधुमेह आहे. त्यांना ऐकायलाही कमी येतं. त्यांना त्यांच्या लग्नाचा दिवसही स्पष्टपणे आठवत नाही.

पण त्या दुर्घटनेनंतरचे दिवस आजही त्यांच्या आठवणीत आहेत.

त्या आठवणी सांगताना त्या म्हणतात, सुरुवातीला कुटुंबातील एकानेही मला काहीच सांगितलं नाही

नंतर आयटीबीपीच्या एका पथकाने त्यांच्या कुटुंबाला सांगितलं की, कदाचित मोरुप यांचा मृत्यू झाला आहे.

मोरुप यांचे भाऊ आणि भारतीय लष्करातून निवृत्त झालेले सैनिक ताशी सोनम सांगतात, मी अधिकाऱ्यांना विचारलं की त्यांच्या मृतदेहाचे काय झालं, तेव्हा त्यांनी तो परत आणणे शक्य नव्हतं, असं सांगितलं.

नंतर मोरुप यांच्या कुटुंबीयांनी मृतदेहाशिवायच अंत्यसंस्काराचे विधी करण्याचा निर्णय घेतला.

स्कूरबुचान गाव एका दुर्गम भागात वसलेले आहे. लडाखमधील दुसरे मोठे शहर कारगिलपासून अरुंद डोंगररस्त्यांवरून या गावापर्यंत पोहोचण्यासाठी साधारण 4 तासांचा प्रवास करावा लागतो.

फोटो कॅप्शन,स्कूरबुचान गाव एका दुर्गम भागात वसलेले आहे. लडाखमधील दुसरे मोठे शहर कारगिलपासून अरुंद डोंगररस्त्यांवरून या गावापर्यंत पोहोचण्यासाठी साधारण 4 तासांचा प्रवास करावा लागतो.





यांगस्किट कधीच शाळेत गेल्या नव्हत्या आणि त्यांना त्यांच्या पतीच्या मोहिमेतील धोके किंवा जोखिमीविषयीही फारशी माहिती नव्हती.

त्या भावूक होत सांगतात, ₹मला फक्त इतकंच माहीत होतं की, पर्वतावर वादळ आलं होतं. आम्ही घरी त्यांच्या अंत्यविधीची केला होता, पण त्यांचा मृत्यू झाला आहे, हे मानायला माझं मन तयार नव्हतं.₹

त्या म्हणतात, ₹मी त्यांचा मृतदेह पाहिला नव्हता, त्यामुळे यावर विश्वास ठेवणं माज्यासाठी खूप कठीण होतं.₹

मृतदेह परत आणण्याचं आव्हान किती मोठं?

माउंट एव्हरेस्ट हे जगातील सर्वात उंच शिखर आहे. त्याची उंची 8,849 मीटर आहे. मोरुप यांचा मृतदेह सुमारे 8,500 मीटर उंचीवर आहे. सप्टेंबरपर्यंत हा मृतदेह परत आणण्याचे आयटीबीपीचं नियोजन आहे.

शेर्पा सूत्रांनी बीबीसी न्यूज नेपाळीला सांगितलं की, शरद ऋतूतील म्हणजेच सप्टेंबरच्या गियारोहण हंगामात मृतदेह आणण्यासाठी आधी दोरखंड लावावे लागतील आणि इतर आवश्यक व्यवस्था करावी लागेल. त्यामुळे हे काम आणखी कठीण होणार आहे.

'डेथ झोन'मधून मृतदेह परत आणणं हे खूप धोकादायक आणि खर्चिक काम आहे. या भागातील तापमान उणे 40 अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाऊ शकतं. तसेच येथे समुद्रसपाटीच्या तुलनेत ऑक्सिजनचे प्रमाण केवळ एक तृतीयांश इतकं राहतं. त्यामुळे बहुतेक कुटुंबांना हा खर्च परवडत नाही.

तज्ज्ञांच्या मते, मृतदेह खाली आणण्यासाठी 40 हजार ते 80 हजार डॉलरपर्यंत खर्च येऊ शकतो. हे काम खूपच कठीण असतं, कारण मृतदेह प्रत्यक्ष उचलून खाली आणावा लागतो. यासाठी 6 ते 10 किंवा त्याहून अधिक शेर्पांच्या पथकाची आवश्यकता भासू शकते.

नेपाळचे आघाडीचे गियारोहक आणि मोहिमेचे मार्गदर्शक तिशिरिंग जांगबू शेर्पा यांचं



म्हणणं आहे की, पर्वताच्या उतारावर मागील 30 वर्षांपासून बर्फात गोठलेला मृतदेह परत आणणं हे मोठं आव्हान असेल.

त्यांनी बीबीसी न्यूज हिंदीला सांगितलं, हवामान आणि बर्फाची स्थिती खूप महत्त्वाची असेल. उत्तरेकडील मार्गावर बर्फाच्या भेगा कमी आहेत, पण ती बाजू जास्त धोकादायक आहे. नेपाळच्या बाजूने काही अडचण आली, तर हेलिकॉप्टरने लवकर बाहेर काढता येते. परंतु, चीनच्या बाजूला अशी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही.

फॉरेन्सिक तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, मृतदेह परत आणण्याचं नियोजन करताना त्याची सध्याची शारीरिक अवस्था प्रामुख्याने लक्षात घ्यावी लागेल.

मृतदेह परत मिळाल्यानंतर त्याचा आपल्यासाठी काय अर्थ असेल याबद्दल मोरुपचे कुटुंबीय सावध आहेत. मृतदेहाची ओळख निश्चित करण्यासाठी अद्याप डीएनए चाचणी करण्यात आलेली नाही.

मोरुप यांचा मुलगा दोरजई यांनी बीबीसी न्यूज हिंदीला सांगितलं, ₹काही वर्षांपूर्वी आयटीबीपीने आमच्या रक्ताचे नमुने घेतले होते. परंतु, सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चांशिवाय आम्हाला याबाबत कुणीही काहीही सांगितलेलं नाही.₹

मोरुप यांचं कुटुंबीय चीन सरकारने दिलेलं प्रमाणपत्र अभिमानाने दाखवतं. या प्रमाणपत्रात मोरुप यांनी एव्हरेस्ट शिखरावर यशस्वी चढाई केल्याची पुष्टी करण्यात आली आहे.फोटो स्रोत,ऋ्रअटक्छ ऌअठऊढवळ

फोटो कॅप्शन,मोरुप यांचं कुटुंबीय चीन सरकारने दिलेलं प्रमाणपत्र अभिमानाने दाखवतं. या प्रमाणपत्रात मोरुप यांनी एव्हरेस्ट शिखरावर यशस्वी चढाई केल्याची पुष्टी करण्यात आली आहे.

आज त्यांच्या घरात मोरुप यांच्या आठवणी म्हणून केवळ त्यांची पदकं, ट्रॉफी, गियारोहण मोहिमांचे काही जुने फोटो आणि काश्मीर खोऱ्यातून आणलेला एक ग्लास जपून ठेवला आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे चीन सरकारने दिलेलं एक प्रमाणपत्र. त्यात लिहिलं आहे की, 10 मे 1996 रोजी सायंकाळी 5.30 (17.30) वाजता मोरुप एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचले होते.

मोरुप हे तिबेटच्या बाजूने एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचले होते. त्यामुळे चीनच्या सरकारने त्यांच्या या कामगिरीची दखल घेत त्यांना हे प्रमाणपत्र दिले होते.

'इतकी वर्षे तुम्ही कुठे होता?'

दरवर्षी 10 मे रोजी मोरुप यांचं कुटुंब त्यांच्या आठवणीत विशेष बौद्ध प्रार्थनेचं आयोजन करतं.

जर मृतदेह परत आणण्याची मोहीम यशस्वी झाली, तर त्यांच्या वडिलांवर लेहमधील शहीद पार्कजवळ अंत्यसंस्कार केले जातील, असं त्यांचा मुलगा पंचोक दोरजई यांनी बीबीसीला सांगितलं.

दोरजई म्हणाले, माज्या वडिलांनी देशासाठी आपला जीव दिला. त्यांना हुतात्मा म्हणून स्मरलं गेलं पाहिजे.


त्यांच्यासोबत जीव गमावलेल्या इतर गियारोहकांनाही हाच सन्मान मिळायला हवा, अशी मागणीही त्यांनी केली.

त्यांनी सांगितलं की, कुटुंबीय मोरुप यांच्या एव्हरेस्ट शिखरावर पोहोचल्याच्या प्रमाणपत्रासोबत त्यांच्या आठवणींची एक खास निशाणी घरात अभिमानाने जपून ठेवेल.

ते म्हणाले, आम्ही ग्रीन बूट्सची आठवणही आमच्यासोबत जपून ठेवू इच्छितो.

यांगस्किट, सोनम आणि कुटुंबातील इतर सदस्यांना आशा आहे की, मृतदेह परत आणण्याची मोहीम यशस्वी होईल आणि अखेरीस मोरुप यांचा मृतदेह घरी आणता येईल. त्यांना ही देखील चिंता आहे की, पर्वतावर 3 दशके उलटून गेल्यानंतर मृतदेहाची ओळख पटू शकेल का?

यांगस्किट म्हणतात, 'जेव्हा ते घरी येतील, तेव्हा मी त्यांना विचारेन, इतकी वर्षे तुम्ही कुठे होता?'



पोलीस बातमी पत्र


महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६

संपादकीय

देशात 'वन नेशन वन एज्युकेशन'ची आवश्यकता!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

सध्याच्या परिस्थितीत देशातील राजकीय पुढारी स्वतःला सर्वेसर्वा समजत आहे.कारण त्यांना मोठ्या सरकारी सुविधा, अवाढव्य पगार,भत्ते, अवाढव्य सुरक्षा कलच, सरकारी गाड्या व अन्य सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांना आपले शिक्षण पूर्ण करतांना शिक्षण प्रणाली कडून किती हाल सहन करावे लागतात याचे दुःख विद्यार्थीच (जेन-झी)सांगु शकतात.कारण शिक्षण शिकत असताना त्यांना सरकारी यंत्रणेकडून अनेक कठीणायीचा सामना करावा लागतो आणि आता नीट पेपर फुटी प्रकरण विद्यार्थ्यांना असहय्य झाल्यामुळे त्यांना रस्त्यावर यावे लागले.कारण शिक्षण विभागाने केलेल्या चुका सरकार मानायला अजिबात तयार नाही.शिक्षण क्षेत्र सुरक्षित रहावे व विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी देशात शिक्षण मंत्रालयाची स्थापना करण्यात आली.अशा परिस्थितीत शिक्षण विभागामध्ये ज्या काही चुका होतात किंवा पेपर फुटी सारखे गैरप्रकार घडतात याची संपूर्ण जबाबदारी सरकारची असते म्हणजेच शिक्षण मंत्रालयाची. परंतु नीट पेपर फुटीवरून लक्षात आले की, शिक्षण विभागाने आपले हात झटकले व पेपर फुटीचे आरोप माजी शिक्षा मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर येवू नये म्हणून त्यांवर पांघरूण घालण्यासाठी पेपर फुटीचे खापर एनटिएच्या अधिकाऱ्यांवर फोडण्यात आले व एनटीएच्या 47 अधिकाऱ्यांना ताबडतोब हटविण्यात आले ही सर्व लौटनकी एकट्या धर्मेंद्र प्रधानला वाचविण्यासाठी सरकारने केली.म्हणजे शिक्षण प्रणालीत सुधारणा करण्या ऐवजी त्यावर पांघरूण घालने सरकारला जास्त महत्वाचे वाटले असावे.नीट पेपर फुटीचा प्रकार पहाता देशातील अनेक राज्यात शिक्षण व्यवस्थेत गोडबंगाल असल्याचे स्पष्ट दिसून येते.याकरिता आज देशाला "वन नेशन वन एज्युकेशन" ची नितांत आवश्यकता आहे.वन नेशन वन एज्युकेशन अंमलात आणली तर शिक्षणाला व शिक्षण व्यवस्थेला मोठा फायदा होऊ शकतो.ह्यवन नेशन वन एज्युकेशनह्ण (One NationOne Educatian) म्हणजेच संपूर्ण देशात एकच शैक्षणिक धोरण आणि अभ्यासक्रम लागू केल्यास भारतीय शिक्षण व्यवस्थेला मोठे फायदे होऊ शकतातः यामध्ये 1) समान शैक्षणिक दर्जा (Equal Educational Standard) शिक्षणाचा भेदभाव दूर होऊन ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षणाचा फरक संपेल. सर्वांनाच समान संधी मिळेल यात गरीब आणि श्रीमंत विद्यार्थ्यांना एकाच पातळीवरील शिक्षण मिळेल.देशातील सर्व शाळांमध्ये उच्च दजार्चे शिक्षण देणे शक्य होईल. 2) पालकांची आणि विद्यार्थ्यांची बदली सुलभ (Easy Migration) होईल व अभ्यासक्रमात अडचण येणार नाही.पालकांची दुसऱ्या राज्यात बदली झाल्यास मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.सर्व राज्यांमध्ये एकच बोर्ड असल्याने शाळा बदलणे अत्यंत सोपे होईल.वेगवेगळ्या राज्यांत नवीन पुस्तके खरेदी करावी लागणार नाहीत. 3)स्पर्धा परीक्षांसाठी सोपे (Beneficial for Competitive Exams) NEET, JEE किंवा UPSC सारख्या राष्ट्रीय परीक्षांसाठी सर्व विद्यार्थ्यांना समान अभ्यासक्रम मिळेल. शालेय पुस्तकांतूनच राष्ट्रीय परीक्षांची तयारी करणे सोपे होईल.केंद्रीय बोर्डाच्या (CBSE) विद्यार्थ्यांना मिळणारा अतिरिक्त फायदा सर्वांना मिळेल. 4) दजेर्दार शैक्षणिक संसाधने (Quality Resources) एकच डिजिटल प्लॅटफॉर्म मिळेल ह्यदीक्षाह्ण (DIKSHA) सारख्या ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा वापर सर्वांना करता येईल.देशभरातील तज्ज्ञांकडून सर्वोत्कृष्ट अभ्यासक्रम तयार केला जाईल. सर्व विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मोजमाप एकाच निकषावर होईल. 5)प्रशासकीय आणि आर्थिक फायदा (Administrative Efficiency) पहाता वेगवेगळ्या राज्यांच्या बोर्डांवर होणारा प्रशासकीय खर्च वाचेल. केंद्र सरकारला शिक्षण क्षेत्रासाठी बजेट आणि योजना आखणे सोपे जाईल. देशभरात एकच शैक्षणिक डेटाबेस असल्याने फसवणूक थांबेल व पेपर फुटीसारख्या प्रकारावर आळा बसेल.या योजनेचा पूर्ण फायदा घेण्यासाठी भारताची विविधता लक्षात घेऊन प्रादेशिक भाषांचा सन्मान करणे देखील तितकेच आवश्यक ठरेल.आज देशात शिक्षा प्रणाली व्यावसायिक झाल्याचे दिसून येते.कारण सध्याच्या परिस्थितीत ९० टक्के विद्यार्थी कोचिंग क्लासेसच्या आदिन झाले आहेत कारण पाहिजे त्या प्रमाणात विद्यार्थ्यांना शाळा- महाविद्यालयामध्ये शिकविल्या जात नाही.त्यामुळे पालकांना आपल्या मुलांच्या भविष्यासाठी कोचिंग क्लासेसचा सहारा घ्यावा लागतो याकरिता पालकांना मोठ्या प्रमाणात रक्कम सुध्दा मोजावी लागते.आज भारतात केंद्र व राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार (युडीआयएसई नुसार) देशात १०,३२०४९ शाळा होत्या आणि यात १८७२७ शाळा बंद झाल्या व सध्या अंदाजे १०,१३,३२२ सरकारी शाळा कार्यरत आहेत, तर उच्च शिक्षणामध्ये सुमारे १,००० पेक्षा जास्त सरकारी व अनुदानित विद्यापीठे आणि हजारो सरकारी महाविद्यालये आहेत.एवढी सरकारी सुविधा उपलब्ध असतांना राजकीय पुढारी आपल्या मुलामुलींना विदेशात शिक्षणासाठी पाठवितात आणि देशातील विद्यार्थी आपल्या हक्कांसाठी देशात लढतो आहे.

आज सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशातील १८७२७ पेक्षा जास्त शाळा बंद झाल्याचे दिसून येते.राजकीय पुढाऱ्यांनी शिक्षणाचा एवढा बाजार मांडला आहे की, स्वतःचे मोठमोठे शाळा- महाविद्यालये खोलुन मोठ्या प्रमाणात पालकांकडून डोनेशन वसूल करतात.परंतु शिक्षण व्यवस्थित नसल्याचे मुलांना कोचिंग क्लासेसचा सहारा घ्यावा लागतो.परंतु वन नेशन वन एज्युकेशन प्रणाली अंमलात आणली तर गरीब-श्रीमंत- सर्वसाधारण यांना कमी पैशात सहज शिक्षण उपलब्ध होवू शकते.आज देशातील राजकीय पुढारी देशातील विद्यार्थ्यांच्या अडचणींनकडे लक्ष न देता स्वतःच्या मुलांचे भविष्य सुधारण्याच्या उद्देशाने आपल्या मुलांना विदेशात शिकण्यासाठी पाठवितात हे देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. देशात वन नेशन वन इलेक्शन ची तयारी सुरू आहे त्याचबरोबर सरकारने वन नेशन वन एज्युकेशनच्या तयारीला लागने गरजेचे आहे. जेव्हा पासून देशात नीट पेपर फुटीचा प्रकार घडला तेव्हा पासून पक्ष-विपक्षाच्या राजकीय पुढाऱ्यांचे शिक्षणाकडे लक्ष कमी आणि राजकारणाकडे सर्वांचे लक्ष असल्याचे दिसून येते.पेपर फुटीच्या प्रकाराला कंटाळून २१ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या तरीही सरकारचे किंवा राजकीय पुढाऱ्यांचे डोळे उघडले नाही.परंतु शिक्षण प्रणालीच्या बाबतीत जेन-झीने सरकारचे,पक्ष-विपक्षांचे व संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांचे डोळे उघडले व विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे केंद्र सरकारने जागे झाले व आणलेल्या सार्वजनिक परीक्षा गैरप्रकार प्रतिबंध दुरूस्ती विधेयक २०२६ ला लोकसभेत व राज्यसभेत मंजुरी मिळाली.यामुळे परीक्षांमध्ये सुधारणा अवश्य होईल.परंतु देशातील प्रत्येकांची मुल-मुली यात सर्वसामान्य, गरीब, श्रीमंत, राजकीय पुढाऱ्यांची मुले यांना समान शिक्षण मिळावे यासाठी देशात 'वन नेशन वन एज्युकेशन' आणने गरजेचे आहे.



स्थलांतर का?

मोरोक्को आणि स्पेनच्या सीमेवर जे काही घडतंय ते अक्षरशः जगाला हादरवणारे आहे. स्थलांतरीतांचा प्रश्न यापुढे अधिक उग्र होत जाणार याचे तर हे संकेत नाहीत ना? सीमांचे हे लढे अधिक तीव्र होत जाणार हे स्पष्ट दिसत आहे. युरोपियन युनियन आणि आफ्रिकेच्या सीमेवर अलीकडेच घडलेले स्थलांतराचे तांडव केवळ एका देशापुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण आधुनिक सभ्यतेसमोर आणि जागतिक धोरणांसमोर उभे ठाकलेले एक गंभीर आव्हान आहे. स्पेनच्या उत्तर आफ्रिकेतील सेउटा (उी४३) या अतिशय लहान स्वायत्त भूभागावर झालेला हजारो लोकांचा लढा आणि त्यानंतर निर्माण झालेले राजकीय वादळ यामुळे आंतरराष्ट्रीय पटलावर खळबळ उडाली आहे. अवघ्या काही दिवसांत तब्बल ५०,००० हून अधिक लोकांनी मोरोक्कोमधून जमीन आणि समुद्राच्या मागार्ने या सीमेवर धडक दिली. या अभूतपूर्व गर्दीने केवळ स्पेनचीच नव्हे, तर संपूर्ण युरोपियन युनियनची सुरक्षा यंत्रणा हादरवून सोडली आहे. या संपूर्ण प्रकरणाची पाळेमुळे, सोशल मीडियाचा गैरवापर, गरिबीचे वास्तव आणि भूराजकीय संघषार्ची चिरफाड आवश्यक आहे. सेउटा हा उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील स्पेनचा अत्यंत लहान भूभाग आहे. साधारणपणे १० किलोमीटर लांबीच्या या द्वीपकल्पावर नेहमी ८४,००० च्या आसपास लोकसंख्या राहते. परंतु, एकाकी उसळलेल्या या मानवी महापुरामुळे इथली लोकसंख्या अवघ्या काही दिवसांत अक्षरशः दुप्पट झाली. सीमेवर जमलेली ही गर्दी इतकी प्रचंड होती की, स्थानिक प्रशासनाची यंत्रणा पूर्णपणे कोलमडून पडली. तेथील प्रत्यक्षदर्शींनी सांगितलेली दृश्ये अत्यंत मन हेलावणारी होती. हजारो तरुण पुरुष कुठे जावे आणि काय करावे, याबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ होते. त्यांच्यासाठी ना अन्न होते, ना राहण्यासाठी निवारा. दुसरीकडे, स्थानिक नागरिक दहशतीखाली घरात लपून बसले होते आणि सरकारच्या ढिसाळ कारभाराविरोधात त्यांच्यात तीव्र संताप होता. या धावपळीत सीमा ओलांडताना झालेल्या चेंगराचेंगरीत आणि समुद्राच्या काठावर बुडून किमान ७२ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला. जरी काही दिवसांत हा तणाव ओसरला आणि बहुसंख्य लोक परतले, तरी या ४८ तासांच्या अराजकतेने युरोपियन राजकारणावर दूरगामी घाव घातले आहेत. या महाप्रचंड गर्दी मागे नेमकी कोणती कारणे आहेत, याविषयी आंतरराष्ट्रीय पातळीवर दोन प्रमुख प्रवाह समोर आले आहेत. एका बाजूला, स्पेनमधील विरोधी पक्ष आणि युरोपियन उजव्या विचारसरणीच्या नेत्यांचा असा दावा आहे की, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांच्या अति-उदार व स्वागतशील धोरणांमुळे हे संकट ओढवले. नुकताच स्पेन सरकारने बेकायदेशीरपणे राहणाऱ्या १० लाखांहून अधिक स्थलांतरितांचा दर्जा कायदेशीर करण्याची घोषणा केली होती, ज्याची जगभर चर्चा झाली. याशिवाय, स्पेनच्या सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाचाही विपर्यास करण्यात आला. न्यायालयाने म्हटले होते की, समुद्रात पकडलेल्या स्थलांतरितांना भौतिक सीमेच्या अभावामुळे त्वरित परत पाठवले जाऊ शकत नाही. सेउटात पोहोचलेले अनेक तरुण समुद्रातील ब्रेकवॉटर पोहून पार करून आले होते. स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी या सर्व प्रकारामागे मानवी तस्करांना आणि समाजमाध्यमांना मुख्य जबाबदार धरले. इन्स्टाग्राम, टिकटॉकसारख्या प्लॅटफॉर्मवर काही चुकीचे व्हिडिओ आणि संदेश फिरवले गेले. 'समुद्रातून स्पेनमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाला कायदेशीररित्या राहण्याची परवानगी दिली जाईल,' अशा खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या अफवांमुळे हजारो तरुण या भूलभुलैय्याला बळी पडले. या संकटाचे दुसरे बाजूरे टोक मोरोक्को प्रशासनाच्या भूमिकेशी जोडले जाते. २०२१ मध्येही अशाच प्रकारे मोरोक्कोच्या रक्षकांनी साधारण १२,००० लोकांना सेउटात सोडून दिले होते. तेव्हा मोरोक्कोने स्पेनकडून आर्थिक मदत मिळवण्यासाठी आणि 'वेस्टर्न सहारा' प्रदेशावरील भूमिकेवर दबाव टाकण्यासाठी हा मार्ग वापरल्याचे मानले गेले. यावेळच्या प्रकरणातही काही स्थलांतरितांनी असा दावा केला की, मोरोक्कोच्या पोलिसांनीच त्यांना पुढे जाण्याचा रस्ता दाखवला आणि ढकलले. मात्र, मोरोक्को प्रशासनाने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. मोरोक्कोच्या मते, हा लढा त्यांच्या 'थ्रोन डे' सोहळ्याच्या काळात घडला, ज्या दिवशी देश आपली आर्थिक प्रगती जगासमोर मांडत असतो. अशा वेळी देशाची प्रतिमा मलीन होईल असे कृत्य मोरोक्को करणार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. तरीही, स्पेनने मोरोक्कोचा शेजारी आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी देश अल्जेरियासोबत वाढवलेले संबंध मोरोक्कोला खटकले असावेत आणि त्यातूनच हे दबावतंत्राचे फलित असावे, असा कयास अनेक विश्लेषक बांधत आहेत. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहताच स्पेन सरकारने अत्यंत कठोर आणि आक्रमक पवित्रा घेतला. पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी या प्रकाराला थेट 'स्पेनच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला' म्हणून संबोधले. स्पॅनिश सैन्याने आणि सिव्हिल गार्ड पोलिसांनी मोरोक्को प्रशासनाच्या समन्वयाने अवघ्या ४८ तासांच्या आत सुमारे ४८,००० हून अधिक लोकांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे परत पाठवले. मात्र, भविष्यात अशा घटनांना कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी स्पेनने आता सागरी सुरक्षेवर भर दिला आहे. सीमेवरील शांततेनंतर, स्पॅनिश पोलिसांनी मोरोक्कोच्या सीमेवर समुद्रात ५०० मीटर लांबीचा एक अत्याधुनिक फ्लोटिंग बॅरियर बसवण्यास सुरुवात केली आहे. हा पाण्याचा तरंगणारा अवरोध पाण्याच्या वर ३० ते ७० सेंटीमीटर उंच राहतो आणि खाली सुमारे एक मीटर खोलीपर्यंत पसरलेला असतो. त्याच्यासोबत नौदल आणि गस्तीसाठी विशेष मार्गही तयार केले गेले आहेत. यामुळे समुद्रातून अवैधपणे येणाऱ्या मार्गांना तगडा पायबंद बसणार आहे. सेउटाच्या या संकटामुळे केवळ स्पेनच नव्हे, तर संपूर्ण युरोपियन युनियनमध्ये तीव्र राजकीय ध्रुवीकरण पाहायला मिळाले आहे. एका बाजूला २२ युरोपियन देशांनी आणीबाणीची बैठक बोलावून स्पेनला सीमा सुरक्षेसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे म्हटले आहे. परंतु, दुसरीकडे काही युरोपियन देशांनी या संकटाचा निमित्त करून स्पेनला युरोपच्या विना-व्हिसा 'शेनगेन' प्रवास क्षेत्रातून बाद करण्याची किंवा त्यावर निर्बंध आणण्याची भाषा सुरू केली आहे, ज्याचा स्पेनचे पंतप्रधान सांचेझ यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. स्थलांतराचा हा प्रश्न हा केवळ एका देशाचा नसून संपूर्ण युरोपचा सामायिक प्रश्न आहे. परंतु, अंतर्गत राजकीय फायद्यासाठी एकमेकांवर कुरघोडी करण्याची युरोपियन नेत्यांची प्रवृत्ती या संकटात पुन्हा एकदा उघडी पडली आहे.

भाजप, संघाचं कथानक फेल

जंतर मंतरवरील कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाने मोदी सरकार मुळापासून हादरलं आहे का? खरं तर जेन झींच्या आंदोलनाने, त्यांच्या घोषणा, गाणे, हातवारे आणि एकूणच नव्या पिढीच्या भाषेने केंद्र सरकारची छबी उद्ध्वस्त झाली आहे का? भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं नेहमीचं कथानक या आंदोलनाने हाणून पाडलं आहे का? सरसंघचालक मोहन भागवत यांनी जेन झी आणि जेन अल्फाशी संवाद साधून त्यांना प्रबोधन केले, पण आता उसळलेले या वादळाला हे प्रबोधन आवर घालू शकेल का? जंतर मंतरवर 35-36 दिवस विद्यार्थ्यांचं आंदोलन झालं. आंदोलनाची प्रमुख मागणी, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामाही झाला. या आंदोलनात विद्यार्थ्यांनी मरेपर्यंत मार खाल्ला, पॅलेटगनचा वार सोसला, एवढं होऊनही विद्यार्थ्यांनी पोलिसी अत्याचाराला गुलाबाचं फुल देऊन, पोलिसांना अंकल म्हणून उत्तर दिलं. सरकारच्या दडपशाहीविरोधात पोरांनी कठोरात कठोर वार काय केला असेल, तर मीम्समधून प्रत्युत्तर दिलं. गाण्यांतून, जेन झीने त्यांच्या भाषेतून उत्तर दिलं. या हजारो, लाखो विद्यार्थी आंदोलकांमध्ये एखाद-दोन मुला-मुलींनी आक्षेपार्ह शिवीगाळ केली असेल, तर पंतप्रधान पदावरील व्यक्तीने खरंतर त्याची दखलीही घ्यायला नको. त्यांच्या समर्थकांनीही त्याकडे दुर्लक्ष करणं अपेक्षित होतं. एवढ्या मोठ्या मॉबमध्ये एक-दोन पोरं-पोरी वात्रट निघाली म्हणून संपूर्ण आंदोलनच थिल्लर आणि तथाकथित संस्कारांच्या परिभाषेत बसणारं नव्हतं, असा जो आरोप केला जात आहे, यात किती तथ्य आहे. काही मुला-मुलींनी शिवीगाळ केली, हे मान्यही केलं तरी, त्यांना सुळावर द्यायचं असतं का? त्यांच्या घरी रात्री 12 वाजता पोलिसांना पाठवून, तुमचं आयुष्य खराब केलं जाईल, अशा धमक्या जर सरकार द्यायला लागलं, सोशल मीडियातून या मुलांचे चेहरे, नाव, वैयक्तिक माहिती सार्वजनिक केली जात असेल तर, भविष्यातील नाही तर वर्तमानातील त्यांचे जीवन गेल्या चार दिवसांमध्ये नरक यातनेसमान झाले आहे. शिवीगाळ करणाऱ्या एका मुलीने एकदा नाही तर आतापर्यंत शंभरवेळा माफी मागून झाली, मात्र मोदींनी माफ केल्यानंतरही त्यांचे समर्थक तिला बलात्काराची धमकी देत आहेत. सार्वजनिक ठिकाणी जाण्याची भीती तिच्या मनात घर करून बसली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकतर या शिव्यांचा उल्लेख करण्याचीच गरज नव्हती. कारण हे काही गल्लीतील भांडण नाही, की तुमच्या दिवट्याने मला शिवी दिली. बरं शिव्यांचा उल्लेख करून पंतप्रधान महोदयांनी या जेन झींना माफ केलं. त्यानंतर योगी सरकारच्या पोलिसांनी एफआयआर आणि 15 वर्षांच्या मुलीला बलात्कार, हत्येच्या धमक्या देण्यापर्यंत सरकार समर्थकांची मजल गेली. तिच्या एकटीवरच नाही तर तिच्यासारख्या



अनेक मुलामुलींवर, त्यांच्या कुटुंबियांवर चहुबाजूने सरकार समर्थक तुटून पडले आहेत. मोदींच्या माफीच्या व्हिडिओनंतरच या प्रकारात वाढ झाली, त्यामुळे आता या समर्थकांना थांबवण्याचं आवाहनही पंतप्रधान मोदींनाच करावे लागणार आहे. या विद्यार्थ्यांच्या शिव्यांनी तसं सरकारचं काहीही बिघडणारं नाही. हा विषय खरंतर सोडून देण्याचा मोठेपणा दाखवण्याची गरज होती. पण सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला घाबरलं आहे का? अशी शंका यातून येत आहे. विद्यार्थ्यांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लावून त्यांनी भविष्यात अशा आंदोलनात सहभागीच होता नये, याचा धडा सरकार त्यांना देत आहे का? काही विद्यार्थ्यांवर पोलिसी कारवाई झाल्याचे समोर आले तर शेकडो, हजारो विद्यार्थी भविष्यात अशा आंदोलनांपासून आपणहून दूर राहतील. कारण आजपर्यंत मध्यमवर्गीयांना त्यांच्या घरातून सांगितले जातेच की, 'राजकारण हे आपलं काम नाही.' पण या विद्यार्थ्यांनी सर्व जुनाट कल्पनांना मूठमाती देऊन हे आंदोलन केलं. हा विद्यार्थ्यांचा विद्रोह होता, आणि विद्रोहाची भाषा ही गुळमुळीत, तुपभाताची असूच शकत नाही. याच देशात 60-70च्या दशकात दलित साहित्य आलं. त्यानंतर पँथरची चळवळ उभी राहिली. हा व्यवस्थेविरोधातील विद्रोहच होता. त्यांची भाषाही तत्कालीन समाजाला शिवीच होती. मात्र तेव्हाच्या विचारवंतांनी, साहित्यिकांनी त्यांचा विद्रोह आक्रोश हळूहळू समजून घेण्याचा प्रयत्न केला. ही त्या तरुणांची, त्यांच्या आसपासच्या परिसरातील रोजच्या जगण्यातील भाषा होती. तशीच आजच्या जेन झीची भाषा आहे. पंतप्रधानपदावरील व्यक्तीला होर्णाया शिवीगाळीचे समर्थन मुळीच होऊ शकत नाही. मात्र त्यासाठी त्या युवतीला, तिच्या कुटुंबियांना आयुष्यातून उठवण्याचा होणारा प्रयत्नही समर्थनीय नाही. जेन झींच्या आंदोलनाने खरं तर सरकारचं धाबं दणाणलं आहे. ज्या सरकारमध्ये राजीनामा होत नाही, अशी दर्पोक्ती केली जात होती, त्या मोदी सरकारमध्ये विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे राजीनामा झाला, याचा सरकारला आणि त्यांच्या समर्थकांना सर्वाधिक मोठा धक्का बसला आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची देशभरात चर्चा होत आहे.

शिक्षण हा गरीब, श्रीमंत, उच्च मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय, शहरी, ग्रामीण, असा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय. विद्यार्थी हे प्रत्येक घरात आहेत. त्यांच्या भविष्याची चिंता प्रत्येक आई-वडिलांना आहे. यामुळे जनता या आंदोलकांच्या समर्थनार्थ बोलू लागली. गेल्या 12 वर्षांत सरकारविरोधात असलेली सार्वजनिक चुप्पी भंग पावली. आंदोलनात फक्त वैद्यकीय शिक्षणासाठीच्या नीट परीक्षेचाच विषय नव्हता, शिक्षणाचं खासगीकरण, महाग होणारं शिक्षण, पैसे भरूनही गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव, पदवी, पदव्युत्तर आणि इंजिनिअरिंगचे शिक्षण घेऊनही विद्यार्थ्यांना सहन करावा लागत असलेला बेरोजगारीचा शिक्का, असा सार्वत्रिक रोष या आंदोलनातून दिसत होता. हा रोष असाच वाढत राहिला तर सत्तेच्या खुर्चीर्ला निर्माण होणारा धोका ओळखून सत्ताधार्यांनी आता लक्ष विचलित करण्यासाठी शिव्यांचा मुद्दा पुढे केलेला दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही दिवसांमध्ये रोज रात्री रील करून विद्यार्थ्यांना आपलंसं करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांचा हा प्रयोग सपशेल फसलेला दिसत आहे. या मुलांनी त्यांच्याच रीलची नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यातील गांभीर्य घालवून टाकले. कारण ही मुलं खरं-खोटं जाणणारी आहेत. त्यांच्या कपड्यावरून, हावभाव, वागण्या-बोलण्यावरून ते जेवढे आजच्या परिस्थितीपासून तुटलेले वाटत होते, तेवढे ते अनभिज्ञ नाहीत, हे आंदोलनाने आणि त्यानंतरच्या प्रतिक्रियांवरून समजून येत आहे. फक्त त्यांचा माहिती जाणून घेण्याचा आणि त्यावर व्यक्त होण्याचा मार्ग वेगळा आहे.

या आंदोलनावर सरकार आणि त्यांच्या कोणत्याही यंत्रणेचा परिणाम होताना दिसत नाही तेव्हा पंतप्रधान मोदींनी पुन्हा एकदा व्हिक्टिम कार्ड खेळलेले दिसत आहे.

मला आणि माज्या स्वर्गवासी आईला शिव्या दिल्या यावर ते आले. 2014 पासूनच्या आतापर्यंत प्रत्येक निवडणुकीत त्यांनी अनेकदा हे व्हिक्टिम कार्ड खेळले आहे. मला शिव्या दिल्या जात आहेत. मी शिव्या खाऊनच जगतो, असे दावे त्यांनी केलेले आहेत. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप, संघाच्या लोकांनी आतापर्यंत कोणाला काय-काय बोललं आहे, त्याचीही उजळणी हेच जेन झी करून देत आहेत. मोदींनी कोणाला 'जर्सी गाय', 'पचास करोड की गर्लफ्रेंड' म्हटलं याचे व्हिडिओ समोर येऊ लागले आहेत. तत्कालीन महिला मुख्यमंत्र्यांचा त्यांनी कसा उल्लेख केला, तर त्यांच्या सरकारमधील मंत्र्यांनी 'गोली मारो' असा जाहीर सभेत केलेला उल्लेख, भाजप खासदाराने भर लोकसभेत दिलेल्या शिव्या हेदेखील समोर येऊ लागलं आहे. याला ही जेन झी मोदी आणि भाजप-संघ समर्थकांची हिप्पोक्रसी म्हणत आहे. याबद्दल मोदी आणि त्यांचे समर्थक केव्हा माफी मागणार आहेत? विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने सरकारचे सर्व आडाखे-तडाखे उद्ध्वस्त केले आहेत. या विद्यार्थ्यांना कोणत्याही यंत्रणेच्या सापळ्यात अडकवता येत नाही, आणि त्यांना देशद्रोही ठरवता येत नाही, तेव्हा त्यांना बदनाम करून चचेर्चा रोख बदलण्याचा प्रयत्न सुरू झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांनी जंतरमंतर आंदोलनात देशविरोधी शक्ती असल्याचा आरोप केला. सीजेपीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दीपके यांच्या परदेशातील शिक्षणाचा खर्च कोणी केला असा सवाल करून त्यांच्या कुटुंबावरच हल्ला केला. त्यांच्या वडिलांनी मुलाच्या अमेरिकेतील शिक्षणाचा खर्च कसा भागवला? असे सवाल केले. भाजप आणि संघ समर्थकांना या आंदोलनाचे कोणतेच उत्तर सापडले नाही तेव्हा आता बदनामीचा उतारा शोधला जात आहे. मात्र येथेही ते तोंडघशी पडताना दिसत आहेत.

भाजपचे खासदार, मंत्री यांची मुलं कुठे शिकली याची यादीच सोशल मीडियावर फिरत आहे. यांचा खर्च कोणी आणि कसा केला याचे उत्तर आता लिमये देणार आहेत का? जंतरमंतरवर पंक्चर काढणारे आणि चावी बनवर्णायांची मुलं असल्याची मुक्ताफळं लोकसभेत दुसऱ्या खासदाराला शिव्या देर्णाया रमेश भिदूडी यांनी उधळली आहेत. यातून लक्षात येत आहे की, भाजप, संघाचं एकही नॅरेटिव्ह सध्या चालताना दिसत नाही. 12 वर्षे सत्तेत राहिल्यानंतर आम्हाला कोण प्रश्न विचारू शकतं, या अहंगंडामध्ये अजूनही सरकार आहे, त्यातून त्यांनी बाहेर येण्याची गरज आहे. हिंदू-मुसलमान, स्मशान-कब्रस्तान, गाय, गोमुत्र, दाढी, कपडे हेच भाजपचे आतापर्यंतचे कथानक राहिलेले आहे, ते व्हॉट्सॲप अंकल-आंटीपर्यंत चालले.

मात्र आऊट स्पोकन आणि इन्स्टाग्रामसोबत वाढलेल्या जेन झीला ते आता यात अडकवू शकत नाहीत, हे खरं भाजप आणि संघाचं दुःख आहे. भाजपची मातृसंस्था असलेल्या सघांचे सरसंघचालक यांनी जेन झीचे उसळलेले वादळ शमवण्यासाठी त्यांच्याशी संवादाची गरज असल्याचे प्रतिपादन केले, पण त्यांनी स्वतः जेन झी आणि झेन अल्फा यांच्याविषयी गुरुवारी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना अतिशय बचावत्मक उत्तरे दिली. खरे तर त्यांना मोदी सरकारला दोन शब्द सुनावून संघाच्या संस्काराची जाणीव करून देता आली असते, पण त्यांनी ते टाळले. त्यामुळे पुढील काळात नव्या पिढीचे आव्हान पेलण्यास संघ भाजपला सहाय्य करताना सावध भूमिका घेईल, असेच सरसंघचालकांच्या मुलाखतीतून दिसत आहे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६

बाळूमामा मंदिरात तब्बल 60 कोटी 75 लाखांच्या गैरव्यवहाराचा आरोप

उपनिबंधक रागिणी खडके फरार, तिघांविरोधात गुन्हा दाखल

कोल्हापूर। देशातील आस्थेचं प्रतीक असलेल्या राम मंदिरातील राजरोस लूट देशभरामध्ये चचेर्चा आणि संसदेतील रणकंदनाचा मुद्दा झाला असतानाच, आता महाराष्ट्रातील तमाम भक्तांचं आराध्य दैवत असलेल्या श्री क्षेत्र आदमापूर येथील बाळूमामांच्या मंदिरामध्ये सुद्धा कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे मंदिरांमधील भ्रष्टाचार आता पुन्हा एकदा नव्याने चर्चेत आला आहे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर रागिणी खडके फरार

कोल्हापूर येथील प्रसिद्ध अशा बाळूमामा मंदिरामध्ये तब्बल 60 कोटी 75 लाखांचा गैरव्यवहार झाल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे हा मंदिरांमधील सर्वात मोठा आर्थिक घोटाळा असावा, असा दावा केला जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणामध्ये उपनिबंधक रागिणी खडके यांच्यासह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर रागिणी खडके या फरार झाल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणामध्ये तत्कालीन सहाय्यक धमार्दाय आयुक्त निवेदिता पवार यांच्यावरही या संपूर्ण घोटाळ्यामागे गंभीर हात असल्याचा आरोप तक्रारदारांकडून करण्यात आला आहे. त्यामुळे आता या प्रकरणाची व्याप्ती वाढत असल्याचं



कोल्हापूर येथील प्रसिद्ध अशा बाळूमामा मंदिरामध्ये तब्बल 60 कोटी 75 लाखांचा गैरव्यवहार झाल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे हा मंदिरांमधील सर्वात मोठा आर्थिक घोटाळा असावा, असा दावा केला जात आहे.

दिसून येत आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच कोल्हापूर जिल्हा प्रमुख निलोत्पल यांनी बाळूमामा देवस्थान समितीमध्ये 60 कोटी 75 लाख 28 हजार रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचं म्हटलं होतं आणि या संदर्भात भुदरगड पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात येत आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार धमार्दाय आयुक्त देवस्थान शाखेचे निरीक्षक राजेंद्र गडकरी यांनी श्री संत सदुरू बाळूमामा देवस्थान समितीच्या तत्कालीन निरीक्षक तथा कार्याध्यक्ष रागिणी खडके, सचिव रावसाहेब वीराप्पा खोतकरी (रा. भडगाव, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) यांच्यासह संबंध विश्वस्त, व्यापारी, कंत्राटदारांसह मध्यस्थांविरोधात फिर्याद दाखल केली आहे. यामध्ये संशयित त्यांनी संगनमत करून, कारस्थान रचून विश्वासघाताने फसवणूक केल्याचं फियार्दीमध्ये म्हटलं आहे. दरम्यान, गुन्हा दाखल होताच हा संपूर्ण तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला आहे. या पथकाकडून सखोल तपास करण्यात येणार असल्याचं ही निलोत्पल यांनी स्पष्ट केलं होतं.

घर 1 पण भाडेकरू 17 पवईत'ड्रीम होम'च्या नावाने कोट्यवधींचा गंडा



मुंबई। मुंबईतील पवई परिसरातील तुंगा गावात घरभाड्याच्या नावाखाली मोठी फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. एका घरमालकाने एकच घर तब्बल 17 जणांना भाड्याने देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून लाखो रुपयांची रक्कम उकळल्याचा आरोप करण्यात आला आहे. या फसवणुकीमुळे मोठी खळबळ माजली असून फसवणूक झालेल्या नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी संबंधित या घरमालकाविरोधात पवई पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी घरमालकाने ''हेवी डिपॉझिट''च्या नावाखाली प्रत्येक भाडेकरूकडून सुमारे ६ लाख रुपये घेतले. घर भाड्याने देण्याचा करार करूनही प्रत्यक्षात घराचा ताबा न देता, भाडेकरूंना दर महिन्याला ठराविक रक्कम परतावा म्हणून दिली जात होती. त्यामुळे अनेकांना सुरुवातीला हा प्रकार लक्षात आला नाही. या पद्धतीने १७ जणांकडून पैसे घेत आरोपीने अंदाजे सव्वा कोटी रुपयांची रक्कम जमा केल्याचा आरोप आहे. मात्र, एका दाम्पत्याला संशय आल्यानंतर त्यांनी तुंगा गावातील संबंधित घराला भेट दिली. त्यावेळी घरावर बँकेची जप्तीची कारवाई झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. मात्र त्या घरमालकाने बँकेचे कजार्चे हप्ते न भरल्यामुळे संबंधित मालमत्तेवर जप्तीची प्रक्रिया सुरू असल्याचे समोर आले आणि त्यानंतर संपूर्ण फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी पीडित भाडेकरूंनी पवई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी संबंधित घरमालकाविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणात आणखी किती जणांची फसवणूक झाली आहे, तसेच जमा केलेली रक्कम कुठे वापरण्यात आली याचा तपास पोलीस करत आहेत. मात्र फसवणुकीच्या या घटनेमुळे मोठी खळबळ माजली असून नागरिकांनी सावध आणि सतर्क रहावे, असे आवाहन करण्यात आलं आहे.

अज्ञात आरोपीने आवळला गळा तपास सुरु

नागपूर। मुंबई शहरातील विलेपार्ले पश्चिम परिसरात अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मनोजकुमार अयोध्या यादव (वय 35) यांचा मृतदेह इमारतीच्या तळमजल्यावरील पाण्याच्या टाकीत आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस विविध अंगांनी तपास करत आहेत.

विलेपार्ले पश्चिम येथील अभिजीत बिल्डिंग, एस. व्ही. रोड येथे ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अज्ञात आरोपीने प्रथम मनोजकुमार यादव यांचा गळा आवळला. त्यानंतर त्यांचे दोन्ही हात कपड्याच्या दोरीने मागे बांधण्यात आले. यानंतर मृतदेह इमारतीच्या तळमजल्यावरील पाण्याने भरलेल्या टाकीत टाकण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. एवढेच नव्हे, तर पाण्याच्या टाकीचे लोखंडी झाकण बंद करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचाही संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

पोलिसांकडून तपास सुरु

घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वरिष्ठ



मुंबई शहरातील विलेपार्ले पश्चिम परिसरात धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका 35 वर्षीय व्यक्तीला गळा आवळून संपवण्यात आले आहे.

पोलीस अधिकारी आणि गुन्हे शाखेचे अधिकारी यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून त्याचा अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण अधिक स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस विविध दिशांनी तपास करत आहेत. इमारतीतील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, घटनेच्या आधी आणि नंतर परिसरात वावरणाऱ्या संशयितांची माहिती गोळा केली जात आहे. तसेच मृताच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींची चौकशीही सुरू आहे.

या घटनेमागील नेमका हेतू काय होता, आरोपीची ओळख कोण आहे आणि या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे विलेपार्ले परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, तपासाच्या निष्कर्षाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

55 कोटींचं ऍनालॉग पनीर नष्ट, 33 परवाने रद्द, 11 एफआयआर रद्द



एफडीएने महाराष्ट्रात ऍनालॉग चीज अर्थात आर्टिफिशियल पनीरवर एका वषार्ची बंदी घातली आहे. याआधी अशा पनीरचा मोठा साठा नष्ट केला असल्याची माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली आहे.

मुंबई, अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळयुक्त अन्न पदार्थांविरोधात कारवाई करत आहेत. एफडीएने महाराष्ट्रात ऍनालॉग चीज अर्थात आर्टिफिशियल पनीरवर एका वषार्ची बंदी घातली आहे. त्यानंतर आज तुकाराम मुंढे यांनी या कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली आहे.

आता पर्यंत 55 कोटी रुपयांच ऍनालॉग चीज नष्ट करण्यात आले असून अनेकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

आर्टिफिशियल पनीरवर बंदी

FDA चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना त्यांनी म्हटले की, महाराष्ट्रात ऍनालॉग पनीर म्हणजे नॉन डेरी पनीर विकल जात होतं. त्याचा विपरीत परिणाम लोकांच्या आरोग्यावर होतो, त्यामुळे महाराष्ट्र राज्यात 30 जुलै रोजी अधिसूचना काढून उत्पादन प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, विक्रीवर आणि वितरणावर बंदी घातली आहे. दंडात्मक कारवाई होणार पुढे बोलताना मुंढे यांनी सांगितले की, आम्ही 308 ठिकाणांवरून पनीरचे नमुने घेतले होते, त्यातील 35 टक्के नमुने घातक होते. आता आगामी काळात विशेष मोहिम राबवणार आहोत, जिथे गोदामं आहेत तिथे तपासणी होणार आहे. आता आगामी काळा आस्थापनांनी दुधाच्याच पनीरचा वापर करावा, कुणी बनावट पनीर विकताना आढळल्यास दंडात्मक कारवाई करणार आहोत.

28 लाख किलो साठा जप्त

तुकाराम मुंढे यांनी पुढे बोलताना सांगितले की, अन्न पदार्थांसंदर्भात 25 मे ते 31 जुलै पर्यंत मोठी कारवाई करण्यात आली. 3 हजार 136 आस्थापनांची तपासणी करण्यात आली,

तसेच 774 आस्थापन्ना नोटीसा पाठवण्यात आली आहे. तसेच 165 आस्थापनाचे परवाने रद्द करण्यात आले. या कतारवाईत 28 लाख 66 हजर 96 किलो साठा जप्त करण्यात आला आहे. याची किंमत 55 कोटी रुपये होती. तसेच राज्यातील 890 फूड आऊट लेट्सची तपासणी करण्यात आली.

पनीर हा दुधाचा पदार्थ आहे पण ऍनालॉग पनीरमध्ये नॉन दुग्धजन्य पदार्थ आढळले आहेत, त्यामुळे त्यावर बंदीचा निर्णय घेतला आहे. अशा पनीरची छुप्या पद्धतीने विकली जाऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. सगळे आदेश उत्पादक प्रक्रिया करणारे, वाहतुकदार , वितरक, विक्रेते यांच्यासाठी बंधनकारक असणार आहेत. आता हॉटेल देखील ऍनालॉग पनीर वापरू शकत नाही, कारण या पनीरमध्ये प्रोटीन पेक्षा वनस्पती चरबी आढळली आहे. जी शिक्षा गुटखाबंदी संदर्भात आहे, तीच शिक्षा ऍनालॉग पनीर विकणाऱ्यांना दिली जाणार आहे.

एफडीएची मोठी कारवाई

- आता पर्यंत नष्ट केलेला माल झ 28 लाख 66 हजार 096 किलो
- नष्ट केलेल्या मालाची किंमत झ 55.72 कोटी
- 890 हॉटेलची तपासणी
- 329 हॉटेलला सुधारणा नोटीस बजावल्या
- परवाने निलंबित

11 एफआयआर दाखल करण्यात आले

खासगी वाहनांवर 'पोलीस' लिहून चमकोगिरी करणे महागात पडणार



मुंबई : आपल्या खासगी दुचाकी आणि चारचाकी वाहनांवर 'पोलीस' असे लिहून किंवा लाल रंगाची पाटी लावून चमकोगिरी करणे आता महागात पडणार आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबवून दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाने राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. राज्यातील अनेक पोलीस अधिकारी व अंमलदार आपल्या खासगी वाहनांवर 'पोलीस' असे लाल रंगाच्या अक्षरांत लिहून किंवा पाटी लावून फिरताना दिसतात. मात्र, अशा पाट्यांचा वापर करून अवैध कामे केली जात असल्याचे आणि पोलीस पाटीमुळे या गाड्यांची साधी तपासणीही होत नसल्याने त्यांचा वापर भाडेतत्त्वावर अवैध वस्तूंची ने-आण करण्यासाठी केला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. मुंबई उच्च न्यायालयानेही या गैरप्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत कठोर कारवाईचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर, महामार्गांवर तसेच शहरांत अशा प्रकारे 'पोलीस' पाटी किंवा नाव आढळल्यास संबंधित वाहनचालकांवर महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या कलम १३३ (६) सह मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १७७ अन्वये कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. यामुळे नियमबाह्य पद्धतीने खासगी वाहनांवर शासकीय पदाचा रुबाब दाखवणाऱ्या चालकांवर चाप बसणार आहे.

बनावट कागदपत्रे सादर केल्यास प्रवेश रद्द होणार

विद्यार्थ्यांविरुद्ध होणार कारवाई, CET कक्षाचा निर्णय



मुंबई : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सध्या विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या प्रवेश प्रक्रियेमध्ये तपासणी दरम्यान किंवा पडताळणीअंती सादर केलेली कागदपत्रे चुकीची, खोटी, बनावट किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश तत्काळ रद्द करण्याचा निर्णय कक्षाने घेतला आहे. तसेच संबंधित विद्यार्थ्याविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरताना अनाथ, संरक्षण दल, दिव्यांग, अल्पसंख्यांक या आरक्षणाचे लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड केलेली आहेत. या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करून महाविद्यालयांमध्ये जागांचे वाटप करण्यात येत आहे. कागदपत्रांची योग्य पडताळणी न करता प्रवेश निश्चित केला आहे असे सिध्द झाल्यास अशा संस्थावर देखील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

पुन्हा पाऊस रौद्ररुप दाखवणार!

मुंबई, जुलै महिन्यात धुमाकुळ घातलेल्या पावसाने आता ऑगस्टमध्ये काहीशी विश्रांती घेतली आहे. 12 ऑगस्टनंतर हवामानात बदल होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र प्रादेशिक हवामान केंद्र कुलाबाने दिलेल्या अंदाजानुसार, येत्या 5 दिवसांत राज्यातील विविध जिल्ह्यांत ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण किनारपट्टी आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर पावसाचा जोर अधिक राहणार आहे. तर मुंबईत रविवारनंतर पावसाचा जोर वाढणार आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर, मुंबई आणि पालघरमध्ये हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुणे, सातारा,कोल्हापूर आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये घाटमाथ्याच्या भागात मुसळधार ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. येथेही यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुणे घाट क्षेत्रासाठी हवामान विभागाने 'ऑरेंज अलर्ट' जारी केला असून, तेथे तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या अंदाजामुळे स्थानिक पातळीवर पूरस्थिती निर्माण होणे, संवेदनशील भागात दरडी कोसळणे आणि पश्चिम घाटातील रस्ते वाहतुकीत व्यत्यय येण्याची शक्यता आहे. विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ यांसारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने 'कोणताही इशारा दिलेला नाही. या जिल्ह्यांमध्ये हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याची किंवा केवळ तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com